# व्यवस्थापन अर्थ, व्याख्या  व व्यवस्थापन अभ्यासाची गरज

**Meaning and Definition of Management and Need for Management Study**

## व्यवस्थापन -अर्थ-

व्यवस्थापन यशस्वीपणे व कार्यक्षमपणे चालविण्यासाठी नियंत्रण व निर्देशनाची गरज असते. निर्देशन व नियंत्रण करण्यासाठी केंद्रस्थानी असलेल्या या यंत्रणेस व्यवस्थापन असे म्हटले जाते. व्यवसायातील सर्व उत्पादन साधनांच्या प्रयत्नांना संघटित करून निर्देशित व नियंत्रित करण्यासाठी व्यवस्थापन आवश्यक ठरते. व्यवसायात प्रत्येकाला आपल्या सवयीनुसार काम करण्यासाठी मोकळीक दिल्यास कोणताही गोंधळ होत नाही. कामात गती, शिस्त, नियमित व नियंत्रित काम राहण्यासाठी नियंत्रणाची गरज असते. व्यवसाय चांगल्या पद्धतीने होण्यासाठी व्यवसायापुढे विशिष्ट उद्दिष्ट असावे लागते आणि ते साध्य करण्यासाठी निर्देशन व नियंत्रणाची गरज असते.

व्यावसायिक संस्थेचे ध्येय व उद्देश साध्य करण्यासाठी आपणास मनुष्य आणि साधनसामग्रीची आवश्यकता असते. त्यांचा योग्य प्रकारे उपयोग करणे याला 'व्यवस्थापन असे म्हटले जाते. व्यवस्थापन ही अतिशय व्यापक प्रक्रिया आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने व्यवसायाशी निगडित व्यवस्थापकीय कार्यांचा प्रामुख्याने विचार करण्यात येतो, संघटन, नियोजन, नियंत्रण, समन्वय आणि मार्गदर्शन ही व्यवस्थापनाची कार्ये आहेत. कर्मचारी हा समाजशील घटक आहे. समूहात राहून काम करणे त्या व्यक्तीला आवडते. त्यामुळे आपल्या मर्यादांवर मात करणे त्या कर्मचाऱ्यांना सहज शक्य होते आणि आपली उद्दिष्टे साध्य करू शकतो. म्हणून तर सामाजिक घटकांच्या परस्पर सहकार्याने सामंजस्य व समन्वयाने व्यक्ती आपली उद्दिष्टे परिणामकारक व यशस्वीपणे पूर्ण करते.

## व्यवस्थापन व्याख्या -DEFINITION OF MANAGEMENT

"व्यवस्थापन ही अशी एक प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये योजना तयार करणे, संघटना निर्माण करणे कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन करणे आणि पूर्वनियोजित उद्दिष्टे प्राप्त व्हावी म्हणून या प्रत्येक कार्यामध्ये कला व शास्त्राचा उपयोग करणे हे अभिप्रेत आहे."  -जॉर्ज टेरी.

व्यवसायातील घडामोडीचा अंदाज घेणे, कार्याचे नियोजन व संघटन करणे, सर्व कार्यामध्ये स मन्वय साधणे व कार्यावर नियंत्रण ठेवणे म्हणजे व्यवस्थापन करणे होय." -हेनरी फेयाल.

**" Management means to manage for forecast, to plan to organize, to command, to co-ordinate and to control" - Henry Feyal**

"एखादे विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी इतरांच्या प्रयत्नांचे नियोजन, समन्वय व नियंत्रण करून त्यांना कार्य तज्ज्ञ करणे म्हणजे व्यवस्थापन होय." जेम्स लुंडी

“व्यवस्थापन म्हणजे जे कार्य करतात ते होय, व्यवस्थापन एक अवयव आहे की, ज्याचे वर्णन व व्याख्या फक्त त्याच्या कार्यावरून करता येईल. " - पीटर ड्रकर

"व्यवस्थापन म्हणजे कर्मचारीविषयक प्रशासन होय. व्यवस्थापन व्यक्तिविकास आहे, निर्देश देणे नव्हे, त्यांच्या मते व्यक्तीसोबत समाधानकारक कार्य करणे हे व्यवस्थापनाच्या कामाचा एक भाग नाही तर ते एक पूर्ण काम आहे, “ - लॉरेन्स ॲपली

"व्यवसायाची वाढ, अर्थपुरवठा, मुख्य धोरणाची आखणी, आवश्यक त्या साधनाची व्यवस्था, व्यवसाय कार्य ज्या अंतर्गत चालणार त्या संघटनेचे सामान्य स्वरूप निश्चित करणे आणि प्रमुख अधिकाऱ्यांची निवड सर्वांशी असलेल्या कर्तव्याचा व कार्याचा समावेश व्यवस्थापनात - होतो.’’ -किम्बॉल आणि किम्बॉल

“समूहाची उद्दिष्टे गाठण्यासाठी समूहासाठी व्यक्तींना कार्यक्षमपणे वातावरण निर्माण करणे व टिकविणे म्हणजे व्यवस्थापन होय.”-कुन्टझ आणि ओडोनल

“पूर्वनिर्धारित उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी निर्णय घेण्याची आणि उपक्रमात कार्यरत कामगारांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्याची क्रिया म्हणजे व्यवस्थापन होय, - स्टॅन्ले व्हान्स

**व्यवस्थापन अभ्यासाची आवश्यकता/गरज (NEED FOR MANAGEMENT STUDY)**

व्यवसायात प्रशासनाने उद्दिष्टे ठरविल्यानंतर व्यवस्थापनाचे कार्य सुरू होते. व्यवस्थापनाच्या यशावर व्यवसायाचे यश अवलंबून असते. व्यवसाय संघटनेमध्ये उपयोगात येणाऱ्या साधनसामग्रीचे आणि व्यक्तीचे नियंत्रण करणारी व पूर्वनियोजित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योजिलेली यंत्रणा म्हणजे व्यवस्थापन होय. उत्पादन घटकांना संघटित व दिग्दर्शित करून त्यांच्यापासून संपत्ती निर्माण करण्याचे काम व्यवस्थापनाचे असते,

व्यवस्थापन चांगल्या प्रकारचे असल्यास व्यवसायाला चांगले यश मिळू शकते. त्यामुळे उद्योगातील व्यवस्थापन शास्त्रीय पद्धतीने करण्याकडे व्यावसायिकाचा कल आहे. व्यवस्थापनात शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास करून डॉ. टेलर यांनी शास्त्रीय व्यवस्थापनाची कल्पना मांडली व आज ती जगप्रसिद्ध झालेली आहे. शास्त्रीय व्यवस्थापनामुळे उद्योगात, उत्पादनात, वितरण क्षेत्रात होणाऱ्या खर्चात बचत होते; तसेच जाहिरात क्षेत्रातदेखील बचत होते. त्यामुळे उत्पादन क्षेत्राबरोबरच शास्त्रीय व्यवस्थापनाची कल्पना, व्यापार, व्यवसाय, सरकारी व निमसरकारी संस्था, बँका, विमा कंपन्या, शैक्षणिक संस्था या क्षेत्रांमध्ये फायदेशीर ठरलेली आहे.

व्यवस्थापन अभ्यासाची आवश्यकता/गरज खालील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**1. व्यवसायाच्या उद्दिष्टांची पूर्तता :**

प्रत्येक व्यवसायात व्यवसायाची पूर्वनियोजित उद्दिष्टे निश्चित केली जातात. ती पूर्ण करण्याची जबाबदारीही व्यवस्थापनावर असते. व्यवस्थापन हे भौतिक साधने व कर्मचारी यांच्यावर अवलंबून असते. कर्मचारी घटक हा 'संघटन' या गोष्टीचा आधार घेत असतो. म्हणून व्यवसाय संघटन व व्यवस्थापन यांच्यात चांगला समन्वय असणे गरजेचे आहे. त्यामुळे व्यवसायाच्या उद्दिष्टांची पूर्तता होण्यास मदत होते.

**2. उपलब्ध साधनसामग्रीचा उपयोग :**

कोणत्याही व्यवसायात उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचा उपयोग अतिशय चांगल्या पद्धतीने केल्यास त्यांचा व्यवसायाला फायदा होतो.व्यवसायाला केवळ भांडवल, कर्मचारी, जमीन, पाणी, साधनसमाग्री यांच्याबरोबर व्यवस्थापनाची देखील गरज आहे. व्यवसायात विभिन्न साधनांचे एकत्रीकरण करून त्यांचा प्रभावी वापर करावा लागतो.

**3.उत्पादनात वाढ :-**

व्यवसायाच्या उत्पादनात वाढ करणे हा व्यवसायाचा प्रमुख उद्देश असतो. उत्पादनात वाढ करण्यासाठी व्यवस्थापनाची अतिशय गरज आहे. कारण व्यवस्थापनामुळे कच्च्या मालाची खरेदी किंमत वाहतूक खर्च कमी करता येतात. तसेच कच्च्या मालासाठी कमी खर्च आल्यास उत्पादन वाढवण्यास मदत होते

**4. उत्पादन खर्च कमी करता येतो :**

प्रत्येक व्यवसायात उत्पादन खर्च हा जास्त असतो. त्यामुळे त्यांचा परिणाम हा नफ्यावर होत असतो. शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन केल्यास उत्पादन खर्चातदेखील बचत होऊ शकते. म्हणून भविष्यकाळात व्यवसायामध्ये शास्त्रीय व्यवस्थापनाचा उपयोग केल्यास उत्पादन खर्च कमी करता येईल.

**5. नफ्यामध्ये वाढ करणे:**

व्यवसायात नफ्यामध्ये वाढ करण्यासाठी व्यवस्थापनाची गरज आहे. व्यवस्थापनामुळे जास्तीचा खर्च कमी करता येतो तसेच खर्चात काटकसर करता येते. उपलब्ध साधनसामग्रीचा पुरेपूर वापर करता येतो. त्यामुळे नफ्यामध्ये वाढ होण्यास मदत होते.

**6.व्यवसायात स्थिरता आणणे :**

व्यवसायामध्ये अनेक धोके आहेत. या धोक्यामुळे व्यापार व व्यवसायाला अस्थिरता निर्माण होते. ही अस्थिरता टाळण्यासाठी व्यवसाय व्यवस्थापनाची गरज आहे. व्यवसाय स्थिर करण्यासाठी व्यवस्थापनाने अचूक निर्णय घेणे गरजेचे असते.

**7. व्यवसायातील गुंतागुंत व नवनवीन बदल:**

बाजारपेठेत होणारे सततचे नवीन बदल आणि स्पर्धक यांनी वापरलेले नवीन तंत्रज्ञान यांचा सतत व्यवस्थापनाला अभ्यास करावा लागतो. तसे बदल आपल्या व्यवसायात करावे लागतात. उदा., दूरदर्शन, टेलिफोन, रेडिओ, प्रसारमाध्यमे इत्यादी.

**8.कार्यक्षमतेत वाढ:**

व्यवसायाची कार्यक्षमता ही पूर्वनियोजनावर अवलंबून असते आणि पूर्वनियोजनाचे कार्य हे प्रशासन करीत असते. व्यवसायास अपयश हे भांडवला अभावी नाही तर उपलब्ध असलेल्या साधनसामग्री व कर्मचाऱ्याचा योग्य समन्वय साधला नाही म्हणून येते. त्यासाठी व्यवस्थापन हे कार्यक्षम असणे गरजेचे आहे.

**9. तांत्रिक व वैज्ञानिक विकास :**

व्यवस्थापनामुळे तांत्रिक व वैज्ञानिक विकास करता येते. बाजारपेठेत झालेले तांत्रिक व वैज्ञानिक विकास यावर व्यवस्थापनाला सतत लक्ष ठेवावे लागते. नाही तर व्यवसायाला बाजारपेठेतून बाहेर जावे लागते. उदा., एच.एम.टी. घड्याळ.

**10. बाजारपेठेचे संशोधन :**

बाजारपेठेचे संशोधन व व्यवस्थापन यांच्यात अतिशय जवळचा संबंध आहे. बाजारपेठ संशोधनामुळे प्रत्यक्ष बाजारपेठेचे ग्राहकांचे व वस्तूंच्या किमतीचे (वजन, रंग, आकार, चव) संशोधन केले जाते. बाजारपेठ संशोधनामुळे साध्य केलेल्या वस्तूला चांगल्या प्रकारची मागणी आहे. यांचे चांगल्या प्रकारे ज्ञान मिळविता येते. बाजारपेठ संशोधनामुळे ग्राहकांच्या आवडी-निवडी, सवयी, चालीरीती इत्यादी गोष्टींचे सहज संशोधन करता येते. व्यवसायाच्या तेजी-मंदीच्या चलाचे बाजारपेठ संशोधनामुळे व्यवस्थापनाच्या सहज लक्षात येते. त्यामुळे व्यवसायात भविष्यात होणारा तोटा आपणास टाळता येतो.

वरील सर्व मुद्यांचा विचारात घेता व्यवस्थापन अभ्यासाची आवश्यकता आहे.